महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.७२५/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ११ जून, २०१८

**प्रस्तावना -**

१. अमनोरा नॉलेज फौंडेशन, अमनोरा पार्क टाऊन, हडपसर, पुणे संचलित अमनोरा स्कूल, हडपसर, ता.हवेली, जि.पुणे या शाळेस मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता . सदर शाळेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय-**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत अमनोरा नॉलेज फौंडेशन, अमनोरा पार्क टाऊन, हडपसर, पुणे संचलित अमनोरा स्कूल, हडपसर, ता.हवेली, जि.पुणे ही नवीन शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ **अटी व शर्ती -**

(१) सदर संस्थेने मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५०, संस्था नोंदणी अधिनियम,१८६० अंतर्गत संस्था नोंदणी प्रमाणपत्र किंवा कंपनी अधिनियम , २०१३ च्या कलम ८ अंतर्गत कंपनी नोंदणी प्रमाणपत्र , संस्थेची घटना किंवा कंपनी मेमोरेंडम ऑफ असोसिएशन , अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्र, विहित निकषाची व मुदतीची मुदतठेव , लगतच्या ३ वर्षाचे लेखापरीक्षण , शाळेच्या प्रस्तावित ठिकाणच्या जमिनीबाबत किमान ३० वर्षे कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत शासनास तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. या बाबींची पूर्तता न केल्यास सदर शाळेचे मान्यता आदेश आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(२) सदर शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा -या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्याआत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना -हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नताना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा -या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच , ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही . शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढशाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित केले आहे . त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " **स्वयंअर्थसहाय्यित**

तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आ.ना. भोंडवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षणसंचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जि.प. पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)